Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# ग. ह. खरे यांची संशोधन पध्द्ती विषयीचे विचार: एक अवलोकन

**प्रा. डॉ. गावंडे के. एस.**
इतिहास विभागप्रमुख,
अंकुशराव टोपे महाविद्यालय,
जालना.

इ.स.१९३० साली खरे भारत इतिहास संशोधन मंडळात क्युरेटर म्हणुन नोकरीस लागले व तो व्याप सांभाळून त्यांनी विविध शाखांचा अभ्यास केला, इतिहास लेखन, संशोधन चालू ठेवले होते. त्यांच्या मनामध्ये अशा प्रकारची इतिहास संशोधन वृत्ती प्रामुख्याने स्वाभिमानानेच प्रेरीत झाली होती. इतिहास लेखनाच्या आणि संशोधनाच्या कार्यात उपयोगी पडतील अशा प्रचंड दप्तराचा शोध त्यांनी लावला आहे. असंख्य कागदपत्रे त्यांनी एकत्र केली. अर्थात खरे यांना त्यावेळी कोणत्याही प्रकारचे सरकारी अनुदान मिळत नव्हते. इतिहास संशोधन प्रवृत्तीतूनच मराठी, हिंदी, फार्सी, कानडी, उर्दू, संस्कृत व इंग्रजी भाषांचा सखोल अभ्यास केला होता. तर अरबी व प्राकृत भाषाचा अभ्यास मात्र त्यांनी संशोधनापुरता केला होता.

श्री. खरे यांनी इतिहास संशोधन प्रवृत्तीने प्रेरीत होऊनच संपूर्ण भारताचा प्रवास केला. सिंध व पूर्वबंगाल या दोन प्रातांचा प्रवास मात्र त्यांना करता आला नाही. संपुर्ण भारताच्या दौ-यात बहुतेक सर्व संग्राहलये व उत्खनन केंद्रे त्यांनी पाहिली. महाराष्ट्रातील विविध घराण्यांचा अभ्यास करण्यासाठी त्या त्या घराण्यातील मिळविलेल्या कागदपत्राचे संघटन केले तळेगावदाभाडे, चांदोरी-हिंगणे, आटपाडी, चांदवड-देशपांडे, अगडी, आलमेल, एकसंबे, कोप्पळ, गदग, निपाणी, लक्ष्मेश्वर येथील देसाई, नेर्लीचे मुतालीक देसाई, नळदुर्ग व सोलापूरचे देशमुख इ.कित्येक घराण्यांची फार्सी, मराठी कागदपत्रे होती. खरे यांनी मिळविलेल्या या कागदपत्रांची संख्या सुमारे लाखाच्या घरात जाईल. याशिवाय सुमारे २०००० पोथ्या, ५००० नाणी, १५० चित्रे, ३० ताम्रशिलाशासने आणि सुमारे २०० ऐतिहासिक वस्तू त्यांनी मंडळास मिळवून दिल्या.

श्री. खरे यांनी आपल्या इतिहास संशोधन पध्द्तीत प्रामुख्याने शिलालेख, ताम्रपट, प्राचीन मुर्ती, फारसीकागदपत्रे, उर्दू कागदपत्रे इ.चे मोठया प्रमाणावर संशोधन केले. शिलालेख व ताम्रपट यांचा अभ्यास करण्यासाठी ते स्वत: ब्रम्ही लिपी शिकले तर फार्सी कागदपत्राची माहिती मिळविण्यासाठी त्यांनी फार्सी भाषेचेही स्वत:च ज्ञान अवगत करुन घेतले. त्यांच्या इतिहाससंशोधन व लेखन पध्द्तीचे प्रमुख वैशिष्टये म्हणजे काटेकोरपणे आणि शास्त्रशुध्द्पणे इतिहासाचे लेखन करावयाचे आणि तसे करीत असतांना इतर कशाचीही पर्वा करायची नाही. हे त्यांचे ब्रिदवाक्य होते.

श्री. खरे यांच्या इतिहास संशोधनपध्द्तीत ऐतिहासिक कागदपत्रे संशोधनाचे आणखी एक वैशिष्टये म्हणजे एखादा लेख किंवा ऐतिहासिक कागदपत्र आणल्यानंतर ते वाचत असत. यथाशास्त्र त्याच्या नक्ला तयार करणे, त्याचे सारांश काढणे, किंवा भाषांतर करणे, त्यावर टिपा देणे व मुद्रण तयार करणे ही सर्व कामे खरे स्व:तच करीत असत. ताम्रपट आणि शिलालेख मिळविण्यासाठी ताम्रपट मालकाकडे त्यांना अनेकवेळा विनवण्या कराव्या लागत असत. तर काही वेळा शक्य न झाल्यास दुस-या एखाद्या व्यक्तीस त्यांना मध्यस्थ करावा लागत असे. त्यानंतर खरे हे संबंधीत ताम्रपट आणि शिलालेखाचे ठसे घेत असत. या कामात त्यांना श्री. आबासो मुजुमदार, श्री. वि.वि. जोशी, श्री. स.ग. जोशी, श्री. द.वि. आपटे यांचे ब-याच प्रमाणावर सहकार्य लाभले होते.

श्री. खरे यांच्या इतिहासलेखन आणि संशोधनपध्द्तीचे आणखी एक वैशिष्टये म्हणजे प्राचीन फार्सी लेखांचे नागरी लिपीत रुपांतर करुन छापणे हे होय. उदा. ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड १ या त्यांच्या ग्रंथाचे कोणतेही पान पाहिल्यास ही गोष्ट आपल्या त्वरीत लक्षात येईल. ही पध्द्ती वापरण्याचे कारण सांगताना श्री. खरे

म्हणतात, या पध्द्तीमुळे एक मोठा फायदा आला आहे. महाराष्ट्रातील ऐतिहासिक संशोधन करणा-यामध्ये फार्सी जाणणारे व वाचणारे क्वचित सापडतील. संशोधकास मूळ लेखात असलेल्या शब्दाचे महत्व अतिशय असते. पण हे लेख मी फार्सी लिपीतच छापले असते तर संशोधकासही त्याचा उपयोग झाला नसता. तेव्हा हे लेख मी लिप्यानंतर करुन छापले आहेत. या पध्द्तीशिवाय श्री. खरे यांनी ग्रंथाचे शेवटी खुलाशासाठी टिपा देण्याच्या पध्द्तीचा अवलंब केल्यामुळे संबंधीत फार्सी पत्राचा कालानुक्रम समाजावून घेण्यास मोठया प्रमाणावर त्याची मदत होते. ताम्रपट आणि शिलालेखांचे त्यांनी जे संशोधन केले आहे त्यामध्ये माहिती वर्णन करतांना त्यांच्या संशोधन पध्द्तीचे आणखी एक वैशिष्टये दिसून येते ते म्हणजे संबंधीत शिलालेख किंवा ताम्रपट केंव्हा उपलब्ध झाला, कोणी करुन दिला, त्या ताम्रपटाचे सविस्तर वर्णन, अक्षरवाटीका, भाषा, कालनिश्चय, स्थलनिश्चय, वंशवेल इ. घटना त्यांनी नमुद केल्या आहेत. अशा प्रकारची पध्द्ती त्यांच्या दक्षिणेच्या मध्ययुगीनइतिहासाची साधने या ग्रंथाच्या तीन खंडात आपणास पहावयास मिळेल. त्यांच्या या विस्तृत माहितीमुळे संबंधीत प्राचीन ताम्रपट आणि शिलालेख यांची ओळख होण्यास इतिहासंशोधकास मोठया प्रमाणावर मदत होईल.

श्री. खरे यांनी फार्सी कागदपत्रांचे संपादन करतांना व संशोधन करतांना काही वेळा वेगळया पध्द्तीचाही अवलंब केलेला आपणास दिसून येईल. त्यांनी आपल्या फार्सी ग्रंथामध्ये मूळ साधने फार्सी लिपीतच छापली आहेत. आणि इंग्रजी वाचकांना साधनांची कल्पना यावी म्हणून त्याचा मतीतार्थ पुस्तकाच्या शेवटी थोडक्यात दिला आहे. त्यामुळे इतिहास अभ्यासकास मुळ साधनाविषयी एक प्रकारची जिज्ञासा किंवा उत्साह निर्माण होण्यास मदत होते. उदा. अशी पध्द्ती श्री. खरे यांनी आपल्या ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड दोन मध्ये वापरलेली आपणास दिसून येईल.

श्री. खरे यांच्या इतिहाससंशोधन पध्द्तीत त्यांनी स्थल, काल, व्यक्ती यांचा परिचय करुन देण्याचा सतत प्रयत्न केल्याचे दिसते. अर्थात त्यांना या आपल्या पध्द्तीमध्ये ब-याचवेळा अडचणी आल्या होत्या. या संदर्भात ते म्हणतात काल, स्थल आणि व्यक्ती हे इतिहास अभ्यासकांचे तीन डोळे आहेत. या डोळयांनी पत्रे न्याहाळल्याविना त्याचे स्वरुप नीट लक्षात येत नाही. येथे प्रकाशित केलेल्या पत्रापैकी बहुसंख्य राजपत्रे असल्याने त्यावर कालाचा संपूर्ण तपशील अढळला नाही. काही राजपत्रे अतिशय जीर्ण होऊन फाटल्यामुळे त्यांचे कालनिर्देश मात्र मिळाले नाहीत. बातमीपत्रात जागोजाग पुर्णापुर्ण कालनिर्देश असल्यामुळे त्याच्या कालाविषयी प्रश्न उपलब्ध होत नाही. शेवटी अगदी थोडे कागद असे राहीले आहेत की, ज्याचा काल ठरविण्याचा प्रयत्न करावा लागला त्या कागदपत्रात तो प्रयत्न चांगल गमके मिळाल्याने यशस्वी झाला आहे. स्थलनिश्चयाचा प्रयत्न कालनिश्चयाइतका यशस्वी होवू शकला नाही. त्याचे प्रमुख कारण फार्सी लिपीच्या सदोषत्वामुळे स्थलनामांचे अचूक उच्चार मला समजले नाहीत.

श्री. खरे यांनी आपल्या इतिहास संशोधन पध्द्तीत आदिलशाही आणि मुघलबादशाही शिक्क्यांना महत्वाचे स्थान दिले आहे. त्यांनी अंदाजे एक हजार आदिलशाही फरमाने पाहिली होती. आदिलशाही शिक्याचे व मुघल बादशाही शिक्क्यांचे त्यांनी चार प्रकार केले आहेत. ते म्हणजे १) फर्मानांचे आरंभी उठविलेले बादशाही शिक्के २) फर्मानांच्या शेवटी उठविलेले प्रधानांचे शिक्के ३) फर्मानांच्या शेवटी उठविलेल्या मोहरा ४) फर्मानांच्या पाठीवर उठविलेल्या निरनिराळया शेरेक-यांचे शिक्के. श्री. खरे यांना आदिलशाही व बादशाही शिक्कयांचे (मुद्रा) संशोधन करताना आलेल्या अडचणीसंबंधी ते म्हणतात, बादशाही शिक्के प्राय: स्पष्ट उठलेले आढळतात तेव्हा त्याचे वाचन प्रयास न पडता होवू शकले नाही. पण प्रधानांचे शिक्के प्राय: स्पष्ट नसतात आणि मजकूर किंवा दुस-या शिक्यावर अशत: आढळलेले असतात. यामुळे काही शिक्क्यांचे समाधानकारक वाचन २५ ते ३० प्रती बारकाईने अभ्यासूनही देता आले नाही. पण त्यांचा आकार व्यास लागेल तेवढा मजकूर काळ व तपशिल दिला असल्याने शिक्का ओळखण्यास अडचण पडणार नाही.

श्री. खरे इतिहास संशोधन करतांना एखाद्या ठिकाणाविषयी माहिती मिळविण्यासाठी स्वत: भटकत असत. तसेच स्वत: एखाद्या ठिकाणाला जाऊन भेट देत असत. अर्थात अशावेळी कितीही संकटे त्यांच्यावर येवून पडली तरी ते आपल्या धेयापासून काडीमात्र विचलित होत नसत. उदा. महाराष्ट्रातील चार दैवते हा ग्रंथ लिहिताना आचारात्मक व वर्णनात्मक माहिती एकत्र करण्यासाठी तुंगभद्रेपासून गोदावरी पर्यंतच्या प्रदेशात पसरलेल्या बहुतेक ठिकाणी गळागळा पाण्यातून सामान डोक्यावर ठेवून नदीनाले ओलंडावी लागले तर कधी कधी तीन-तीन, चार-चार

मैल चिखल तुडवावा लागला. या चार दैवतांची माहिती जमवितांना जे कष्ट घ्यावे लागले याबाबतची माहिती त्यांनी प्रस्तुत ग्रंथाच्या निवेदनात मार्मिकपणे दिली आहे.

श्री. खरे यांच्या इतिहासंशोधन पध्द्तीचे आणखी एक प्रमुख वैशिष्टये म्हणजे कोणत्याही घटनेविषयी व ठिकाणाविषयी माहिती देतांना ऐतिहासिक, वाड्.मयीन साधनग्रंथांचा भरपूर पुरावा देणे हे होय. परंतु हा पुरावा देतांना ज्या अडचर्णी येतात त्याबाबत त्यांनी असे म्हटले आहे की, कोणत्या साधनात कसा उल्लेख सापडेल याचा नियम काहीच नसतो. कधी तो निर्देश किंवा पुरावा बखरीत असेल, तर कधी कागदात सापडेल, कधी पुराणात मिळेल, तर कधी काव्यात सापडेल, कधी ताम्रशिला शासनात आढळेल, तर कधी नाण्यावरुन ध्यानात येईल, ही साधने कधी मराठीत तर कधी फार्सीत, कधी संस्कृत, द्रविड, प्राकृत अशा कोणत्याही भाषेतील असतील. अशी अनेकविविध साधने संशोधकाला शोधावी लागतात. श्री. खरे यांनी स्वत:ही आपली संशोधनाची पध्द्ती अशाच प्रकारची ठेवली होती. उदा. महाराष्ट्राची चार दैवते हा ग्रंथ लिहिण्यासाठी त्यांना शंभर (१००) ग्रंथाची पहाणी करावी लागली. विविध धार्मिक तिर्थक्षेत्रांना भेटी द्याव्या लागल्या. याशिवाय श्री. क्षेत्र पंढरपूर आणि विठ्ठल हा ग्रंथ लिहिण्यासाठीही स्वत: श्री. खरे पंढरपुरला स्थायिक झाले होते.

श्री. खरे यांनी आपल्या इतिहास लेखनपध्द्तीत ऐतिहासिक कागदपत्रांच्या विशेषत: मराठी कागदपत्रांच्या संपादनावर अधिक भर दिलेला दिसून येतो. त्या काळात मराठी कागदपत्रांची संख्या किती आहे आणि ते संपादन करण्याची पध्द्ती कितपत विकसीत झाली होती या विषयी आपले विचार प्रकट करताना ते म्हणतात महाराष्ट्रात मूळ मराठी छापण्यास प्रारंभ होऊन नव्वद वर्षे झाली. या अवधीत काव्येतिहासकार कै. खरे, के. पारसनीस, कै. राजवाडे इ. व्यक्ती आणि सत्कार्यतेजक सभा, भा.इ.सं.मंडळ, डेक्कन कॉलेज, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पूर्वीचे मुंबई आताचे महाराष्ट्र शासन, हैद्राबाद, बडोदे, ग्वाल्हेर, जुनी संस्थाने यांनी प्रकाशीत केलेल्या मराठी कागदपत्रांच्या संख्या पंचाहत्तर हजार पर्यंत जावी असा अंदाज आहे. तथापि एवढया मोठया व दिर्घकाळ चाललेल्या प्रयत्नातून मराठी पत्रे संपादन प्रकाशीत करण्याची एखादी प्रमाणभुत पध्द्तीत विकसित झाली असे दिसत नाही.

ऐतिहासिक मराठी कागदपत्र संपादनात कालनिश्चयाला श्री. खरे यांनी महत्वाचे स्थान दिलेले दिसून येते. परंतु त्यांच्या मते यात अनेक अडचणी निर्माण होतात या संदर्भात त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, मराठी पत्रव्यवहार प्रकाशीत करावयाचा तर त्यासाठी काही विशिष्ट प्रश्न आहेत. उदा. त्यात आलेले कालनिर्देश, शके, विक्रम, शहुल, फसली, हिजरी इ. कोणत्याही एका किंवा अधिक कालगणनेचे असतात. किंवा त्यात मास व मिती अथवा महिना व तारीख अगर मिती आणि तारीख, नाहीतर नुसता वार एवढाच कालाचा उल्लेख असतो तर काहीत कालनिर्देश नसतो. तेव्हा कालनिश्चय मराठी पत्रसंपादनातील एक महत्वाचा संस्कार आहे. पेशवाईतील पत्रावर हा संस्कार करण्याची विशेष आवश्यकता असते. ते करुन मगच पत्रव्यवहार अभ्यासकापुढे ठेवला तरच त्यावरील श्रमाचे सार्थक होईल.

श्री. खरे यांनी आपल्या इतिहास लेखनपध्द्तीमध्ये विवरणात्मक टिपणावर बराचसा भर दिल्याचे दिसून येते. मराठी कागदपत्रात हजारो अरबी, फार्सी, मोडी पत्रे उपलब्ध आहेत. परंतू ही पत्रे समजावून घेण्यासाठी विवरणात्मक टिपणे नसल्याने वाचकामध्ये ती लोकप्रिय बनत नाहीत. या संदर्भात त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, पत्रे समजावून देणा-या टिपांचा तर पत्ताच नसतो, पत्र कोठे व कसे वापरावयाचे हेच कळले नाही तर, पत्र वाचनात गोडी कशी उत्पन्न होणार ? विवरणात्मक टिपा न देता केवळ भूंडी पत्रे आजवर छापली गेल्याने त्यांना मोजकेच म्हणजे केवळ अभ्यासक वाचक मिळत गेले. म्हणून श्री. खरे यांना या गोष्टीची खंत होती. त्यांच्या मते जूनी कागदपत्रे लोकप्रिय व वाचनिय करावयाची असतील तर त्यावर विवरणात्मक टिपणे लिहून ती बोलकी केली पाहिजेत. टिंपणात एखाद्या पत्रामध्ये अपूरा कालनिर्देश असेल तर त्याचा कालनिश्चय कसा केला त्याच्या कालनिश्चयामुळे ते पत्र इतिहास लेखनात कोठे व कसे कितपत बनते तसेच ते जून्या माहितीत भर घालते अथवा मर्यादीत करते, अथवा खोटी ठरविते हे ही दाखविले पाहिजे. या सर्व गोष्टींचे काटेकारपणे पालन केल्यास पत्र बोलके होईल.

श्री. खरे यांनी इतिहासलेखन पध्द्तीत विवरणात्मक टिपणाप्रमाणे इतिहास लेखनातील अशुध्द्पणासंबंधी आपले विचार व्यक्त केले आहेत. तत्कालीन इतिहास लेखनात असा अशुध्द्पणा होता या संदर्भात ते म्हणतात,

हल्लीच्या शुध्द्लेखनाने तर विलक्षण गोंधळ व अनावस्था प्रसंग उत्पन्न केला आहे. दादोबा पांडुरंग तर्खडकरांचे शुध्द्लेखनाचे नियम रुढीने चालत आले होते. महाराष्ट्र परिषदेने त्यास शास्त्रमत्ता आणण्याचा प्रयत्न केला. पण त्यात मतभिन्नता उत्पन्न झाली. तरीही त्यात काही धरबंद होता. पण हल्लीच्या शुध्द्लेखनात अराजक माजले आहे. आमच्या समोर लेख कसे छापावयाचे आदर्श नाहीत असे नाही. एपिग्राफिया इंडिका आपले कामकाज कित्येक वर्ष चोख बजावित आहेत. मग आदर्श पासून आम्ही काहीच शिकायचे नाही का ? श्री. खरे यांच्या या विचारावरुन इतिहासलेखन पध्द्तीमधील शुध्द्पणा संबंधीची आपणास कल्पना येते.

श्री. खरे यांनी इतिहास लेखन पध्द्तीत सूची कशी तयार करावी या संबंधीही काही विचार मांडले आहेत. या संदर्भात ते म्हणतात, जुन्या पत्रव्यवहारात ब्राम्हणांची आडनावे प्राय: येत नाहीत. उलट ब्रम्हणेत्तरांचे सामान्यत: येतात. पण सनदापत्रात तर सर्वांचीच आडनावे बहुवंशी येतात. अभ्यासक जेवढया लवकर व्यक्तीनाम विसरतो तेवढया लवकर आडनाव विसरत नाही. म्हणून सूची आडनावाच्या अनुक्रमाने करावी. तसे केल्यास एकाच आडनावाचे लोक एकत्र येतात. व संकलनाचे काम सोपे होते. श्री. खरे यांच्या सूची तयार करण्याच्या या विचाराचा फायदा आडनावांची सूची तयार करण्यास उपयोगी पडेल.

श्री. खरे यांनी विविध घराण्याची जुनी कागदपत्रे जशीच्या तशी मिळवून त्यांचा सखोल अभ्यास केला. आणि त्यांच्या प्राप्ती स्थानाविषयी तपशिलवार माहिती तयार केली. त्यानुसार आपल्या लेखनपध्द्ती कागदपत्राच्या प्राप्तीविषयी काही विचार त्यांनी व्यक्त केले आहेत. या संदर्भात ते म्हणतात, जुन्या संशोधकांनी (प्रा. खरे यांच्या पूर्वीच्या) ज्या घराण्यातून मराठी मोडी कागद जमविले त्याच घराण्यात मराठी मोडी कागदाबरोबर फार्सी कागद मिळत असता त्या भाषेच्या ज्ञानाच्या अभावी त्यानी तेथेच ठेवले आहेत. कागदपत्रे कोठून जमविली हे मालक व त्यांचा पत्ता यासह तपशिलवार सांगितले म्हणजे अधिक साक्षेपी संशोधक हा त्याच घराण्यातून त्या आधारे अधिक मराठी,मोडी, फार्सी कानडी, भाषेतील कागदपत्रे मिळवू शकेल. किंवा जुने कागदपत्रे तपासून शंका निवारण करु शकेल. परंतू कागदपत्रांच्या प्राप्ती स्थानांची तपशिलवार माहिती नसेल तर ते शक्य होवू शकणार नाही.

इतिहास लेखनपध्द्तीत इतिहास समजण्यासाठी व पुरावा म्हणून समकालीन कागदपत्र फारच उपयोगी पडतात. असा आणखी एक निष्कर्ष श्री. खरे यांनी काढला आहे. त्यांच्या मते इतिहासाच्यासाधनात उत्तरकालीन साधनापेक्षा समकालीन साधनांची किंमत जास्त समजली जाते. समकालीन साधनापैकी रचित ग्रंथापेक्षा अस्सल पत्रव्यवहार, राजकीय हुकूम इत्यादीनांच जास्त महत्व आहे. रचित ग्रंथामध्ये ते ग्रंथ हेतूपूर्वक रचले जास असल्याने वस्तुस्थिती लपविणे, तिचा विपर्यास करणे, माहिती अपुरी असणे इ. दोष कळत नकळत शिरत असतात. त्यामुळे समकालीन ग्रंथही ख-या माहितीबाबत प्रमाणभूत ठरु शकत नाहीत. या उलट समकालीन कागदपत्र इतिहास लिहीण्याच्या उददेशाने लिहिलेले असतात. त्यांचा मुख्य उददेश इच्छिलेले काम होवून याचे हा असतो. त्यामुळे त्यातील भाषा असंदिग्ध, निश्चित, जोरदार अशी असते. त्यावरुन लेखकांचा हेतू निर्दिष्ट काम वैगरे समजण्यास अडचण पडत नाही. म्हणजे श्री. खरे यांना आपल्या या विचारानुसार एकंदरीत असे सुचवावयाचे आहे की, आजकाल सर्व देशात अशा प्रकारची समकालीन कागदपत्रे इतिहासाचे साधन म्हणून फार महत्व दिले जाते.

श्री. खरे यांच्या इतिहासलेखन पध्द्तीत त्यांचा आणखी एक महत्वाचा विचार म्हणजे इतिहासलेखन पध्द्तीतील साधन ग्रंथाचे महत्व हा होय. या संदर्भात त्यांनी असे म्हटले आहे की, इतिहासाचे पुस्तक साधन ग्रंथाच्या आधाराने लिहिले पाहिजे. सिध्द् ग्रंथांचा उपयोग घटनांचा अर्थ विषदीकरणात मतैक्य किंवा मतभेद दाखविण्यासाठीच मुख्यता करावयाचा असतो. ती साधने इतिहास लेखकाला अप्राप्त किंवा दुष्प्राण असतील तरच तेवढयापुरता सिध्द् ग्रंथांचा साधन म्हणून उपयोग करावयाचा असतो. या संदर्भात श्री. खरे यांनी श्री. स.मा. गर्गे यांच्या करवीर रियासत या ग्रंथाचे परिक्षण केले आहे. साधन ग्रंथांच्या आधाराकडे दूर्लक्ष झाल्यानंतर इतिहासलेखनात कसे दोष निर्माण होतात याबाबत श्री. खरे यांनी असा निष्क्र्ष काढला आहे की, मनुष्याची प्रवृत्ती सामान्यत: साधेपणा, कष्टचुकारपणा याकडे असते. तिचा मग जय होवून इतिहास ग्रंथाचे लौकीक ग्रंथात रुपांतर होते व त्याचे महत्व कमी होते. आधारासहीत विधाने आली म्हणजे ती तपासून पहाता येतात व मग त्यायोगे अभ्यासात प्रगती होते. पण आधाराविरहीत विधाने असली म्हणजे ती पडताळून पहाता येत नाही. आणि विधानांच्या सत्यसत्यत्येविषयी संभ्रम निर्माण होतो. त्यामुळे अभ्यासकाच्या दृष्टीने पुस्तक निरुपयोगी ठरले. यानंतर आपल्या

इतिहासलेखन पध्द्तीच्या विचारात श्री. खरे यांनी मराठी साधने व इंग्रजी साधने यांचे श्रेष्ठत्वाच्या दृष्टीने तुलना केली आहे. इंग्रजी अंमलानंतर जो राजकीय इतिहास लिहिण्यात आला त्यावेळी खरे यांच्या मते महत्वाच्या दृष्टीने मराठी साधनांची जागा इंग्रजी साधनांनी घेतली आहे. मराठी साधने इंग्रजी साधनापुढे फिकी पडतात.

या विचारांशी श्री. खरे यांचा विचार समान वाटतो. ऐतिहासिक सामूग्रीच्या व कागदपत्रांच्या परिक्षणाबाबतही क्रोसे यांनी महत्वपूर्ण विचार मांडले आहेत. त्यांच्यामते इतिहासाचे अधिष्ठान साधनसामुग्री व ऐतिहासिक कागदपत्रात नसून या सामुग्रीचे परिक्षण करणा-या मानवी मनात आहे. म्हणजेच क्रोसे यांच्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या परिक्षणांबाबतच्या विचारांशी तुलना करता समान वाटतो. क्रोसे प्रमाणेच इतिहास लेखन पध्द्तीत समकालीन कागदपत्रांचा उपयोग किती महत्वाचा असतो या इतिहासाचार्य राजवाडे यांच्या विचारांचा श्री. खरे यांच्या विचारावर बराच प्रभाव पडल्याचे जाणवते. इतिहासाचे खरे स्वरुप काय आहे याबाबत राजवाडे यांनी तसेच त्यांची लेखन पध्द्ती कशी असावी त्यांचे विषय, स्थळ, तत्वज्ञानाशी त्याचा संबंध, आपल्या देशात इतिहास लेखनाची पध्द्ती कशी आहे याबाबत त्यांनी मराठयांच्या इतिहासाची साधने या ग्रंथात लिहिलेल्या प्रस्तावनेत आपले विचार काही प्रमाणावर समान वाटतात. सारांश, श्री. खरे यांच्या इतिहासलेखन पध्द्तीच्या विचारसरणीवर पाश्चिमात्य इतिहास लेखकापेक्षा राजवाडे यांच्या विचारांचा प्रभाव अधिक असलेला दिसून येतो.

**संदर्भ:**

१) ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड-१४ (भा.इ.सं.मंडळ, पुणे वर्ष ५२ वे) पृ. ८३
२) ग.ह. खरे, ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड-१, (भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे) प्रस्तावना, पृ.२
३) कित्ता, खंड-२, पृ.१
४) कित्ता, खंड-५, पृ.२
५) कित्ता, खंड-३, पृ.२
६) कित्ता, खंड-२, पृ.१
७) ग.ह.खरे (सं.) निवडक लेख, भाग-२, (पुणे), पृ.१३०